# आर.सी.पटेल फार्मसीच्या विद्यार्थ्यांची निकालात भरारी


काजल सोनवणे


इकबाल अहमद


जाहीद अन्वर


प्रिती नायसे


विशाल म्हस्के


हर्षल पवार


वैष्णवी कोलडे


संदीप बिरारी


प्रशांत जैन


राजेश्वरी पाटील


प्रियंका सपकाळे


प्रेम भावसार


रोशन बोधे


मोनिका गिरासे


फैय्याज अहमद


सोनल माहेश्वरी


मेघना निकुंभ

■ **शिरपूर । दि.२२ । प्रतिनिधी**

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या एम.फार्मसी परीक्षेचा निकाल जाहीर झालेला असून शिरपूर येथील आर. सी. पटेल फार्मसीच्या विद्यार्थ्यांना भरघोस यश मिळाले आहे.फार्मसीच्या सर्व शाखा मध्ये आर.सी.पटेल फार्मसी महाविद्यालयाचे विद्यार्थी विद्यापीठातून प्रथम, द्वितीय,तृतीय क्रमांकावर आहेत

प्रथम वर्ष एम.फार्मसी फार्माकोग्रोसी शाखेतून प्रशांत जैन ७. ६९ सी.जि.पी.ए गुण प्राप्त करून महाविद्यालयात व उमवित प्रथम, राजेश्वरी पाटील ७. ५४ द्वितीय तर प्रियंका सपकाळ ७.४६ तृतीय क्रमांकावर आहेत.

फार्माकॉलॉजि विषयातून विशाल म्हसके ७.१५ सी.जि.पी.ए गुण प्राप्त करून विद्यापीठात व महाविद्यालयात प्रथम हर्षल पवार ६. ८५ ललित बिरारी ६.८५ प्रीती नयासे ६.८५ या तिघांनी विभागून द्वितीय क्रमांक पटकावला आणि कलोडे वैष्णवी ६. ७७ सी.जि.पी.ए गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक पटकावला. क्लिनिकल फार्मसी शाखेतून मेघना निकम ही विद्यार्थिनी महाविद्यालयातून व विद्यपीठातूनही प्रथम आहे. प्रेमकुमार बाविस्कर याने ८.७७ गुण मिळवून महाविद्यालयातून फार्मासुटीक्स विषयातून प्रथम तर एम फार्मसी च्या सर्व विषयातून महाविद्यलयातून प्रथम आणि विद्यपीठातून द्वितीय क्रमांक मिळवला. मोनिका गिरासे आणि रोशन बोधे ८.५४ सी.जि.पी.ए गुण मिळवून या दोघांनी महाविद्यलयात द्वितीय आणि विद्यपीठात तृतीय क्रमांक मिळवला. मनीषा सोनवणे आणि सतीश येवले यांनी विद्यापीठात अनुक्रमे चौथा व पाचवा क्रमांक प्राप्त केला. फार्मास्युटिकल केमेस्ट्री फैझान अहेमद महम्मद इस्राइल ८.४७ सी.जि.पी.ए गुण प्राप्त करून महाविद्यालयातून प्रथम, उमवितुन द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. तसेच सोनल माहेश्वरी हिने ८.३१ सी.जि.पी.ए गुण प्राप्त करून महाविद्यालयातून द्वितीय तर उमवितुन तृतीय क्रमांक पटकाविला आहे.

क्वालिटी अशुरन्स शाखेतून झाहीद अन्वर अन्सारी ८.६२ सी.जि.पी.ए मिळवून महाविद्यालयात व विद्यपीठात प्रथम क्रमांक पटकावला. काजल सोनावणे ८.४६ सी.जि.पी.ए गुण मिळवून महाविद्यलयातून व विद्यपीठात द्वितीय आहे. इकबाल अहेमद याने ८.३८ सी.जि.पी.ए गुण प्राप्त करून महाविद्यालयातून व विद्यपीठात तृतीय क्रमांक प्राप्त केला. कु.मेघना निकुंभ हिने क्लिनीकल फार्मसी या शाखेतून ६.१५ सी.जि.पी.ए मिळवून महाविद्यलयात व विद्यपीठात प्रथम क्रमांक पटकावला. सर्व टॉपर व उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. संजय सुराणा यांना दिले.

संस्थेचे अध्यक्ष आ.अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, माजी कुलगुरू डॉ.के.बी.पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय सुराणा, उप-प्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतूक केले आहे.